प्रेसनोट

## लोकमान्य टिळक यांची जयंती

जा.क्र. ५२६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२३/०७/२०१७

भंडाराः— पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. २३/०७/२०१७ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु, अपर पोलीस अधीक्षक भंडारा रश्मि नांदेडकर यांच्या अध्यक्षतेखाली लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्यांचे जिवण चारीत्र्य व कार्यप्रणालीबाबत माहीती देण्यात आली.

लोकमान्य टिळक १८८० मध्ये न्यु इंग्लीश स्कुलची स्थापना केली. व जनजागृती साठी **''केसरी''** हे मराठी व **''मराठा''** हे इंग्रजी असे दोन वृत्तपत्रे प्रसिध्द करायला सुरवात केली. आगरकर केसरीचे तर टिळक मराठाचे संपादक बनले. १८८४ मध्ये पुणे येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व फर्गुशन कॉलेज सुरु केले १८९७ मध्ये टिळकांनवर राजद्रोहाचा आरोप करुन त्यांना दिड वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. १९०८ मध्ये टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. त्यामध्ये त्यांना सहा वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली. तुरुगांत त्यांनी **''गितारहस्य''** हा अमर ग्रंथ लिहला १९१६ मध्ये त्यांनी डॉक्टर ॲनी बेझट यांच्या सहकार्याने होमरुल लिग या संघटनेची स्थापना केली भारतीय होमरुल चळवळीने स्वंय शासनाचे अधिकारी ब्रिटीश सरकार कडे मागितले होमरुल म्हणजे आपला राज्य कारभार आपण करणे यालाच स्वशासन म्हणतात. **''स्वराज्य हा माझा जन्म सिध्द हक्क आहे. तो मी मिळवणारच''**असे टिळकांनी ठामपणे सांगितले. अशा या थोर पुरुषाची आज आपण जंयती साजरी करीत आहोत.

यावेळी कार्यक्रमाला पोनि. घुसर स्थागुशा भंडारा, पोनि. गाडे वानीशा भंडारा, सपोनि. हत्तीमारे जिवीशा भंडारा, नियत्रंण कक्ष अधीकारी सपोनि. सुनगार, पोउपनि. लाकडे, पोलीस उपनिरीक्षक तुळजेवार नियत्रंण कक्ष अधीकारी पोलीस मुख्यालय पोलीस उपनिरीक्षक श्री. प्रधान साहेब, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(ऐ.टी. सुनगार)
स.पो.निरीक्षक
नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९८२३१२३३३६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.